शनिवार, दि. ६ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात गणेशोत्सवानिमित्त धार्मिक स्थळांचे देखावे आणि सामाजिक संदेशांची मांडणी












छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी श्री गणेश मुर्ती व देखाव्यांची छायाचित्रे टिपली आहेत.











**जालना । प्रतिनिधी -** यंदाचा गणेशोत्सव जालना शहरासाठी खास ठरत आहे. शहरातील गणेश मंडळांनी तयार केलेले आकर्षक देखावे आणि मूर्ती पाहण्यासाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी होत आहे. या मंडळांनी केवळ धार्मिक भावनाच नाही, तर सामाजिक प्रबोधनाचेही काम केले आहे. अनेक मंडळांनी देशातील प्रसिद्ध मंदिरांच्या प्रतिकृती सादर केल्या आहेत, ज्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध तीर्थक्षेत्रांचे दर्शन होत आहे.

**जगन्नाथ पुरीचा देखावा:** लक्ष्मीनारायणपुरा येथील फ्रेंड्स गणेश मित्र मंडळाने ओडिशातील प्रसिद्ध जगन्नाथ पुरी मंदिराची भव्य प्रतिकृती साकारली आहे. **श्री शनिशिंगणापूर:** मोरया बजरंग बॉईज गणेश मंडळाने अहमदनगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर मंदिराचा देखावा तयार केला आहे, जेथे शनिदेवाची मूर्ती उघड्यावर आहे. **कामाक्षी देवी मंदिर:** लक्ष्मीनारायणपुरा येथील मानाचा गणपती लक्ष्मीनारायण पंच गणेश मंडळाने तामिळनाडूतील कांचीपुरम येथील श्री कामाक्षी देवी मंदिराचा देखावा सादर केला आहे. **ठाकूर वाके बिहारीलाल आणि द्वारकाधीश:** जय मार्कंडे गणेश मित्र मंडळाने श्री ठाकूर वाके बिहारीलाल मंदिराची प्रतिकृती आणि श्रीहरी बॉईज गणेश मित्र मंडळाने द्वारकाधीश मंदिराचा देखावा सादर केला आहे. **सुवर्णगिरी मंदिर:** लक्ष्मीनारायणपुरा येथील सार्वजनिक गणेश मंडळातर्फे भाग्यनगर (हैदराबाद) येथील सुवर्णगिरी मंदिराची भव्य प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. या देखाव्यांमुळे नागरिकांना एकाच ठिकाणी भारतातील विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेता येत आहे.

श्री तीन खानेश्वर गणेश मित्र मंडळ (मस्तगड, जुना जालना) यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणांवर आणि समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांवर आधारित एक प्रभावी देखावा तयार केला आहे. या देखाव्याच्या माध्यमातून मंडळाने लोकांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश दिला आहे.

या सर्व गणेश मंडळांनी केवळ धार्मिक उत्सव साजरा न करता, सामाजिक जाणीव आणि प्रबोधन यांचा आदर्श घालून दिला आहे. त्यामुळे गणेशोत्सव आता केवळ एक सण न राहता, समाजाला दिशा देणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम बनला आहे.

## संपादकीय

# संकटमोचक गणेश, सर्वांचे संकट हरो!

गणेशोत्सव, हा महाराष्ट्राचाच नव्हे तर अवघ्या देशाचा एक प्रमुख सण आहे. प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणारा हा उत्सव या वर्षीही सर्वत्र धूमधडाक्यात सुरू आहे. शहरांमधील गल्ली-बोळांतून विराजमान झालेले गणपती बाप्पा आणि विविध मंडळांनी सादर केलेले आकर्षक देखावे नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. गणेश चतुर्थीच्या आगमनाने एक सकारात्मक ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवाचा आनंद सर्वत्र असला तरी, मराठवाड्यातील शेतकरी अजूनही मोठ्या संकटात आहेत. अतिवृष्टी, गारपीट आणि आता अनियमित पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर उभे असलेले हे संकट केवळ नैसर्गिक नाही, तर आर्थिक आणि मानसिकही आहे. या संकटातून बळीराजाला बाहेर काढण्यासाठी गणेश बाप्पाने आपले 'संकटमोचक' रूप दाखववावे, अशी प्रार्थना प्रत्येक जण करत आहे. गणेश हा बुद्धी आणि विद्येची देवता आहे. त्यामुळे, केवळ देखावे आणि उत्सवापुरता हा सण मर्यादित न राहता, त्याचे मूळ तत्वज्ञान आत्मसात करणे महत्त्वाचे आहे. आजच्या काळात समाजाला सदबुद्धीची सर्वाधिक गरज आहे. समाजातील समस्या सोडवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य मदत मिळवून देण्यासाठी राज्यकर्त्यांना सदबुद्धी मिळो, जेणेकरून ते योग्य आणि दूरदृष्टीचे निर्णय घेऊ शकतील. समाजात वाढत असलेले मतभेद, द्वेष आणि नकारात्मकता दूर करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला सदबुद्धीची गरज आहे. प्रत्येकाने एकमेकांना सहकार्य करून, समाजाला पुढे नेण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. संकटाच्या काळात शेतकरी बांधवांना योग्य मार्ग निवडण्यासाठी आणि हिंमत न हारता संकटाचा सामना करण्यासाठी सदबुद्धी मिळो, अशी अपेक्षा आहे. गणेशोत्सवाच्या या शुभ पर्वावर, आपण सर्वांनी बाप्पाकडे प्रार्थना करूया की त्याने समाजातील सर्व दुःख, विशेषतः शेतकऱ्यांचे संकट दूर करावे. तसेच, समाजात शांतता, प्रेम आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी सर्वांना सदबुद्धी प्रदान करावी. हा उत्सव केवळ मूर्तीपूजा न राहता, सामाजिक प्रबोधन आणि एकता वाढवण्याचे माध्यम बनो.

# निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या चिंताजनक

आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिन, ज्याचा उद्देश गिधाडांच्या सर्व प्रजातींबद्दल जागरूकता निर्माण व्हावी व घटती संख्या या उद्देशाने २००९ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील बर्ड्स ऑफ प्रे कार्यक्रम आणि युनायटेड किंग्डममधील हॉक कंझव्हन्सी ट्रस्ट सहकार्याने सुरूवात करतात आली. तेव्हापासुन निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या पहाता जगात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या शनिवारला आंतरराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, अणुचाचणी, दारूगोळा, वाढती युद्धजन्य परिस्थितीत व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ-पुर्व-पश्चिम -उत्तर-दक्षिण-पृथ्वी-निसर्ग पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपली आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते.याचाच परिणाम आज मानव, पशुपक्षी, जीवजंतू यांना भोगावा लागत आहे.आज वाढत्या प्रदूषणामुळे पक्षांना आकाशात उडतांना अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो.जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे आणि आता निसर्गाला संतुलित ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते निसर्ग मित्र गिधाड यांनाच आज मृत्यूशी सामना करावा लागत आहे याला अत्यंत भयावह परिस्थिती म्हणावी लागेल. मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे.त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावुन निसर्ग निरोगी ठेवुन पृथ्वीचे,मानवजातीचे व संपूर्ण जीवजंतूचे




रक्षण गिधाड करायचे व करीत आहे.परंतु भारतासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील ९० टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे.गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम मानवजातीनेच केले आहे.भारतात ६ भारतीय व ३ स्थलांतरित अशा ९ प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे. १९८० च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या ४० दशलक्ष पेक्षा जास्त होती.मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या १५-२० वर्षात ९० टक्के गिधाडे संपली. काही प्रजातीतर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.जनावरांना दिली जाणारी डायक्लोफेनॅक औषध ही गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरायला लागली.त्यामुळे सरकारने २००६ मध्ये डायक्लोफेनॅक औषधीवर बंदी घातली.तरीही या औषधीचा वापर होत असल्याने २०१५ मध्ये भारत सरकारने त्यांच्या उत्पादनावर पुर्णतः बंदी घातली.डायक्लोफेनॅकवर बंदी लावली असली तरी इतर नॉन-स्टेरॉइडल ऍंटी-इंफ्लेमेटरी ड्रग्सचा वापर जनावरांवर केला जातो आणि या औषधीचाही वापर गिधाडांसाठी तेवढ्याच धोकादायक आहे.म्हणजेच आपण जनावरांना जेही काही औषधे देतो ती संपूर्ण गिधाडांच्या मृत्यूचे कारण ठरत आहे. त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे.२५-३० वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते. परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते.काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे.कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर विषेली होतात.ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते.यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या ९० टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.एका माहितीनुसार १९९३ ते २००७ दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढऱ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या ९९.९ टक्के नष्ट झाली आहे.याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची ९९ टक्के संख्या कमी झाली आहे. म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे.त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता; भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाची गरज आहे.२०२० ते २०२५ पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे मी स्वागत करतो. आंतराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिनाचे औचित्य साधून निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेच सोबतच संपूर्ण राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.जंगल सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित,निसर्ग सुरक्षित तर पशुपक्षी सुरक्षित, पशुपक्षी सुरक्षित तर आपण सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे. त्यामुळे निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# अतिवृष्टीचा तडाखा; आ. लोणीकर यांच्या पुढाकाराने तात्काळ प्रशासनाचा हस्तक्षेप

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील राजपूत गल्ली येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे रवी सुभाषसिंग चुंगडे यांचे घर कोसळून मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच मा. आमदार बबनराव लोणीकर साहेब व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत तात्काळ प्रशासनाला आदेश देऊन संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविले. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे पंचनामा व शासकीय प्रक्रिया विलंब न होता सुरु झाली.

या दुर्घटनेनंतर भाजप शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, नगरसेवक प्रकाश चव्हाण व नगरसेवक कृष्णा आरगडे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी बाधित कुटुंबाला धीर देत सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. यावेळी तलाठी राऊत साहेब यांना पंचनामा करण्यास लावण्यात आले. शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर म्हणाले की, नागरिकांवर आलेल्या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही आमची जबाबदारी आहे. शासनस्तरावरून मदत मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करणार आहोत.

नगरसेवक प्रकाश चव्हाण व कृष्णा आरगडे यांनीही बाधित कुटुंबाशी संवाद साधून सांगितले की, संकट कितीही मोठे असले तरी आम्ही जनतेच्या सोबत आहोत.

या घटनेत लोणीकर साहेबांच्या त्वरित पुढाकारामुळे प्रशासनाने ताबडतोब प्रतिसाद दिला. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून भाजप पदाधिकारी व लोकप्रतिनिधींच्या तत्परतेचे कौतुक केले आहे.

# सकस पोषण आहाराने कुपोषणावर मात !

राज्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपयोजना आज अंमलात असल्या तरी त्या अपयशी ठरत आहेत. त्यामुळे पाच वर्षाखालील प्रत्येकी तीन पैकी एक बालक कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष अलीकडेच भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (आयआयपीए) अभ्यासाच्या अहवालातून म्हटल्याचे वृत्त समोर आले. या अभ्यास अहवालानुसार राज्यात पाच वर्षाखालील पस्तीस टक्के मुले वाढ खुंटलेली व कमी वजनाची आणि सव्वीस टक्के कुपोषित आहे. म्हणजेच प्रत्येकी तीन पैकी एक मूल कुपोषित असल्याचा निष्कर्ष या संस्थेने काढला आहे.तसेच (आयआयपीए) च्या सुक्ष्म अभ्यासानुसार राज्यात १९९२ मध्ये मध्यम कुपोषणाचे प्रमाण विस टक्के होते. ते २०२१ मध्ये सव्वीस टक्क्यांवर पोहचले. जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी. लहान वयात मातृत्व. शिक्षणाचा अभाव.अस्वच्छ राहणीमान. आणि स्तनपानाचा विलंब या बाबी बालकांच्या कुपोषणास कारणीभूत ठरल्या होत्या,तर आजही बहुतांशी त्या कायम आहेत. बाल कुपोषणाच्या संदर्भात २०१४ पासून तर २०२१ पर्यंत पोषण स्थितीत फारसा असा बदल झाला नसल्यामुळे कुपोषणाची तीव्रता ही दिवसेंदिवस वाढतचं आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणांच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे. खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हातमजुरीवर काम करणाऱ्या लाखों कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही. त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड,वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरच्या ठरतात. आज सकस पोषण आहारांच्या अभावामुळे कुपोषणाची अधिकाधिक तीव्र होते हे स्पष्टच आहे.

बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस' , 'मिशन पोषण २.0', 'सुपोषण अभियान' पण पोषण आहाराचे महत्व जागृतीसाठी 'राष्ट्रीय पोषण सप्ताह 'अशा योजनांची आखणी आहे. राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हेल्थ कार्ड मिळणार असल्याचे वृत्त अलीकडे वाचण्यात आले. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी नियमितपणे होईल हा निर्णय स्वागतार्ह आहे. विद्यमान स्थितीत शहरी व ग्रामीण दुर्गम भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे. राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, मानव विकास मिशन,महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वें शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.



राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे. बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे. कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांच्या सकस पोषणावर भर देणे गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे, तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. आर्थिक हलाखीच्या परिस्थितीत असणाऱ्या कुटुंबातील महिला गर्भवती असल्यास ती व तिच्या बाळांच्या आरोग्य संगोपनासाठी पोषक आहार मिळत नसतो. कुटुंबाचे उत्पन्न असेल तर सकस आहार माता -बालकांना पुरविण्याचा प्रश्न उभा ठाकतो.

शासन संचालित मानव विकास मिशन अंतर्गत माता व बालकांच्या पोषण आहाराकडे आज प्रामुख्याने भर देणे गरजेचे बनले आहे. बाल कुपोषण नियंत्रण आणि बालकांना सकस पोषण संरक्षण पुरविण्यासाठी सर्वोतोपरी प्रामाणिक प्रयत्न आवश्यक असून यात शासन प्रशासनासोबत स्वयंसेवी संघटनांनी सुद्धा हातभार लावणे अत्यंत महत्वाचे ठरते.

**शशिकांत मधुकर तोटे, दारव्हा,**
**जि. यवतमाळ मोः९१३०८३५४५८**
**ई मेलः** shashikanttote1979gmail.com

# भारतीय जनता पार्टीच्या २१ शाखांचे एकाच दिवशी भव्य उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी, जालना महानगर जिल्ह्यातील संघटनात्मक कार्यात मोठा टप्पा गाठत, आज (दि.०५) सेवा पंधरवाडा अंतर्गत जालना शहरातील राम नगर, भिमनगर, गांधी नगर, आरेफ कॉलनी, सुवर्णकार नगर तसेच इतर महत्त्वाच्या परिसरांमध्ये २१ नवीन शाखांचे उदघाटन यशस्वीरीत्या संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उदघाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे आणि मा.आ. कैलासजी गोरंट्याल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे होते. यावेळी मा. नगराध्यक्षा संगीताताई गोरंट्याल आणि भाजपा युवा नेते अक्षय गोरंट्याल यांची विशेष उपस्थिती होती.

उदघाटनाच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते घनतृप्त हनुमान मंदिरपर्यंत भव्य मोटारसायकल रैली काढण्यात आली, ज्यात शहरातील विविध भागांतील कार्यकर्त्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, राजेशजी राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, महिला मोर्चा महानगर जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, ममता कोंड्याल, वर्षाताई ठाकूर, धनराज काबलिये, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम, ग्रामीण मंडळ तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, बाबुराव पवार, अशोक पवार, जीवन सले, शिवादादा शेजूळ, संजय भगत, कपिल भुरेवाल, विजय पवार, माजी नगरसेवक गणेश जल्लेवार, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, विनाताई सामलेटी, संजयजी भगत, राजना येनगुपटला, सखुबाई पणबिसरे, देविदास जाधव, बालाजी रोडे, संजयजी पाखरे, सोनू सामलेटी आदींची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने शहरातील सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आजी-माजी नगरसेवक, जि.प.प.स. सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी बनवला.




# ४६व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र कराटे असोसिएशन (चघ) तर्फे २०२५-२६ मध्ये होणाऱ्या ४६व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेसाठी जालना जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे होणार आहे. जालना जिल्ह्यातील उदयोन्मुख कराटेपटूंना आपली प्रतिभा दाखवण्यासाठी आणि जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे.

**निवड चाचणी स्पर्धेचे तपशील**

जालना जिल्हा शाईन कराटे-डु अँड स्पोर्ट्स असोसिएशन (ट्रस्ट), ज्याला महाराष्ट्र कराटे असोसिएशनची अधिकृत मान्यता प्राप्त आहे, यांच्या वतीने ही निवड चाचणी स्पर्धा आयोजित केली आहे.

स्पर्धेचे नावः जालना जिल्हा कराटे संघ निवड चाचणी स्पर्धा

दिनांक आणि वेळः ७ ऑगस्ट २०२५, सकाळी ९ वाजता

स्थळः श्री म.स्था. जयंत प्राथमिक विद्यालय ग्राउंड, जालना



ही निवड चाचणी खेळाडूंच्या कौशल्याची आणि योग्यतेची पारख करेल. निवड झालेल्या खेळाडूंना जालना जिल्ह्याच्या संघाकडून राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळेल.

**नोंदणी आणि संपर्क**

इच्छुक आणि पात्र खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाव नोंदणी करण्याची अंतिम मुदत ६ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आहे.

अधिक माहितीसाठी, खेळाडू सेन्साई रूपेंद्र गोपाल पारचा यांच्याशी त्यांच्या ९४२३७३०७२७ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपले कौशल्य सिद्ध करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्री तुळजाभवानी नगर मित्र मंडळातर्फे रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सव-२०२५ च्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव जोपासण्यासाठी श्री तुळजाभवानी नगर मित्र मंडळ, जालना यांच्या वतीने काल भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे तांत्रिक सहकार्य जनकल्याण ब्लड बँक, जालना यांनी केले. शहरातील विविध भागातून युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. अवघ्या दोन तासांत तब्बल ३२ जणांनी रक्तदान करून समाजहिताचा एक उत्तम आदर्श घालून दिला.

या रक्तदात्यांमध्ये मंडळाचे काही सदस्य, तुळजाभवानी नगरमधील तरुण तसेच ७ महिलांचा समावेश होता. महिलांचा सहभाग हा विशेष उल्लेखनीय ठरला असून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन रक्तदानाचा संदेश दिला.

शिबिराचे उद्घाटन मंडळाचे ज्येष्ठ सदस्य व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी रक्तदात्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले. रक्तदानासाठी जनकल्याण ब्लड बँक यांच्या वैद्यकीय टीम ने तज्ज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांसह उपस्थित राहून सर्व सुविधा पुरवल्या. रक्तदानापूर्वी प्रत्येक रक्तदात्याची सविस्तर आरोग्य तपासणी करून सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात आली. तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्रासह अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती.



या प्रसंगी जालना विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार कैलास गोरंटयाल, सामाजिक कार्यकर्ते विष्णू पचफुले व विक्रांत ढक्का यांनी मंडळाला भेट देऊन रक्तदात्यांचे व आयोजकांचे अभिनंदन केले. त्यांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांची प्रशंसा करून मंडळाच्या कार्यकर्त्यांना पुढील काळातही सेवा व समाजकार्याची परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले.

शिबिरात प्रथमच रक्तदान करणाऱ्यांचा उत्साह विशेष उल्लेखनीय ठरला. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. आपल्या एका पिशवी रक्तामुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात, असे प्रतिपादन जनकल्याण ब्लड बँक च्या डॉक्टरांनी केले.

मंडळाचे पदाधिकारी म्हणाले की, गणेशोत्सव फक्त धार्मिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची गरज आहे. त्या दृष्टीने रक्तदान शिबिर हा अत्यंत यशस्वी उपक्रम ठरला. त्यांनी सर्व रक्तदाते, वैद्यकीय कर्मचारी तसेच शिबिरासाठी परिश्रम घेतलेल्या कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

श्री तुळजाभवानी नगर मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून आगामी काळात वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, शैक्षणिक मदत आदी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार मंडळाने व्यक्त केला आहे.

# मंडळांनी रांगेत वाहने लावून शांततेत श्री विसर्जन पार पाडावे - रोहित भुरेवाल

## श्री गणेश महासंघातर्फे ऑपरेशन सिंदूर थीम स्टेजची निर्मिती

**जालना । प्रतिनिधी -** गणेश मंडळांनी श्री विसर्जन मिरवणुकीत आपली वाहने रांगेत सहभागी करून प्रशासनाच्या नियमांचे आणि वेळेचे बंधन पाळावे. जनतेनेही मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी होऊन हा सोहळा भक्तीभावाने शांततेत पार पाडावा, असे आवाहन श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष रोहित भुरेवाल यांनी केले आहे.



रोहित भुरेवाल म्हणाले की, शांततेत आणि मोठ्या भक्तीभावाने श्री गणेश विसर्जन मिरवणुकीची जालना शहराची आजवर परंपरा राहिलेली आहे. प्रत्येक गणेश मंडळाने आपली वाहने रांगेत आणि शिस्तीने उभी करावीत. मामा चौक येथे सर्वप्रथम मानाचा गणपती नवयुवक गणेश मंडळाच्या अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकाऱ्यांचे महासंघातर्फे शाल, श्रीफळ, ट्रॉफी देऊन व पारंपरिक फेटा बांधून स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा याच पद्धतीने सन्मान केला जाणार आहे. या सोहळ्याला सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती लाभणार आहे. गणेश महासंघातर्फे ऑपरेशन सिंदूर या थीमवर स्टेजची निर्मिती करण्यात आली आहे. यावेळी मुंबई येथील आर्केस्ट्राही सुरू राहणार आहे. त्यासाठी तीस फुटाचे व्यासपीठ उभारण्यात आले असून, साऊंड इफ`क्ट लाइटिंग विशेष आकर्षण ठरणार आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठी गर्दी होत असते. अशाप्रसंगी सर्व गणेश भक्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष रोहित भुरेवाल यांच्यासह संस्थापक पारसनंद यादव, युवा नेते सुनील खरे, महासचिव मनीष नंद, कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष विकी वाघमारे, शुभम काटकर, दुर्गेश काटोठीवाले, सुनील नंद, योगेश देवावाले, प्रणय सारस्वत, रुपेश भगत, सचिन भुरेवाल, विजय भुरेवाल, कपिल भुरेवाल, हरीश भगत, अर्जुन दहाडे, भूषण नंद, अर्जुन गोरक्षक, गौरव बोरा यांनी केले आहे.

श्री गणेश महासंघाने यंदा गणेशोत्सवात बुद्धिबळ, कॅरम स्पर्धा, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, पथनाट्याद्वारे व्यसनमुक्ती जनजागृती, बेलपत्र रोपांचे वाटप, आदर्श शिक्षक पुरस्कार, शालेय रांगोळी स्पर्धा, खेळांच्या स्पर्धा आणि आयडल सिंगिंग सुपरस्टार स्पर्धेसारखे उपक्रम राबवून समाजोपयोगी कार्याचा उत्तम संदेश दिला आहे. गणेश विसर्जन मिरवणूक शांततापूर्ण आणि सुव्यवस्थित मार्गाने पार पाडण्यासाठी गणेश मंडळांनी प्रशासनाच्या नियमांचे आणि वेळेचे पालन करावे, असे आवाहन श्री गणेश महासंघातर्फे करण्यात आले आहे.

# खेळाडूंनी मेजर ध्यानचंद सारखे नावलौकिक करावे - उमेश दुनगहू



**जाफराबाद । प्रतिनिधी -** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद जालना ज्यांच्या आदेशान्वये १४,१७,१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पी.एम.श्री.जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद येथे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि उद्घाटक म्हणून मुख्याध्यापक श्री.उमेश दुनगहू हे होते. उद्घादन भाषांना मध्ये उमेश दुनगहू सर यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने मेजर ध्यानचंद यांना अभिवादन करून सर्वांना क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या .खेळाडूंनी सी के नायडू , विनू मंकड, कपिल देव, सचिन तेंडुलकर, नीरव चोपडा,कसाबा जाधव,मेरी कॉम,सुनील गावसकर, पी. टी. उषा, सायना मिर्झा, विश्वनाथ आनंद या सारख्या खेळाडूंनी त्यांच्या खेळा मध्ये त्याचप्रमाणे मेजर ध्यानचंद यांनी देशाचे नाव लौकिक केले .

असेच विद्यार्थी खेळाडूंनी ही खेळावे आणि आपल्या शाळेचे,तालुक्यांचे,जिल्ह्याचे, राज्याचे आणि देशाचे नाव लौकिक करावे असे प्रतिपादन केले आहे.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका क्रीडा समन्वयक श्री.वाहेद पटेल सर,प्रा. शिवाजी वैद्य,श्री.जे.एम.सोनवणे , श्रीमती.बी. आर.पेद्दी,श्री.शैलेश वाघमारे,ओम देशमुख इत्यादी क्रीडा शिक्षक उपस्थित होते.या स्पर्धा व्यवस्थित पार पडण्यासाठी पंच म्हणून आकाश छडीदार, स्वप्नील वाघ यांनी चोख भूमिका मांडली.या प्रसंगी जाफराबाद तालुक्यातील पी.एम.श्री.जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद, न्यू हायस्कूल जाफराबाद,समर्थ विद्यालय जाफराबाद,एम.श्री.जिल्हा परिषद प्रशाला माहोरा,जिजामाता विद्यालय हनुमंतखेडा,मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी,सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालय जाफराबाद इत्यादी शाळांनी सहभाग नोंदवला.

या सर्व शाळेचे आणि पंचांचे पी.एम. श्री.जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

# वनपाल राऊतच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून त्याला सेवेतून बडतर्फ करा

## वन परिक्षेत्र अधिकऱ्यांकडे सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बेसुमार अवैध लाकडाची कत्तल होत आहे. जालन्यातील वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयातील कार्यरत असलेले वनपाल भाऊसाहेब राऊत आणि राम नगर येथील वनरक्षक नारायण सुदगीर हे या अवैध लाकूडतोड करणाऱ्यांशी संगनमत करून आणि आर्थिक देवाण घेवाण करून महिन्याला लाखो रूपयाची माया जमवत आहेत. तसेच या माणसाला वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाकडून राहण्यासाठी क्वार्टर भेटलेले असतांना राऊत हे २० ते २५ हजार रूपये किरायाच्या फ्लॅट मध्ये राहत आहे.त्यामुळे राऊत हे रोज अवैधरित्या माया जमवण्याचे काम करत असल्याने त्याला तातडीने चौकशी करून सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे केली आहे.

दररोज रात्री भाड्याच्या गाडीला दोन हजार रूपये देऊन रात्री जालना शहरांमध्ये तसेच तालुक्यामध्ये फिरून बेसुमार हप्ते वसुली करत आहे. कार्यालयाच्या वतीने क्वार्टर भेटला असताना वीस ते पंचवीस हजार रूपये महिना फ्लाईटच्या रूमला भरत आहे. तसेच रोज भाड्याची गाडी करून फिरत आहे. एवढा पैसा याच्याकडे कोठून आला.? याची प्रशासनाने चौकशी करावी तसेच जालन्यातील वन विभागाच्या वन विभागाच्या जमीनीवर काही भूमाफिया कडून पैसे घेऊन त्यांना बसवण्याचे काम हे राऊत करत आहे. वन विभागाच्या जागेवर अतिक्रमण करून त्यांच्याकडे भाडे वसूल करण्याचे काम राऊत हे करीत आहे. अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून याची जालन्यातीन हकालपट्टी करण्यात यावी. या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यामुळे जालन्यातील




वन विभागाच्या जमीनीला भूमाफियाकडून धोका निर्माण झाला आहे. हा जालन्यामध्ये राहिला तर नक्कीच वन जमीनीवर नागरीकांच्या आणि भूमाफियांचा कब्जा होणार आहे. राऊत याच्या भ्रष्टाचारामुळे जालना जिल्ह्यातून बेसुमार लाकूडतोड होत आहे. लाकूड माफियासोबत याचे घनिष्ठ संबंध आहे. तसेच लाकूड माफियाकडून महिन्याचे तीन ते चार लाख रूपये भरणा वनपाल राऊत हा अधिकारी घेत आहे. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून भ्रष्ट वनपाल राऊत याच्यावर त्वरीत कार्यवाही करून त्यांना त्वरीत निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी तसेच त्यांच्या भ्रष्टाचाराची लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी केली आहे.

# बसपाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी राहुल करनाडे यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** बहुजन समाज पार्टीची सुबेदारी शासकीय विश्रामगृह, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथे दिनांक ०४ सप्टेंबर २०२५, गुरुवार रोजी दुपारी १.३० वाजता आयोजित बैठकीत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल डोंगरे व महाराष्ट्र झोन प्रभारी पंडीतराव बोर्डे यांच्या हस्ते जालना जिल्हाध्यक्षपदी राहुल करनाडे यांना नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती पक्षाच्या राष्ट्रीय आणि राज्य नेतृत्वाने केलेल्या बैठकीत नुकतीच जाहीर करण्यात आली.



यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल डोंगरे यांनी नियुक्तीबाबत सांगितले की, राहुल सत्यनारायणजी करनाडे हे सामाजिक कार्य आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित,उपेक्षित, शेतकरी, कामगार आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच या नियुक्तीमुळे पक्षाला जालना जिल्ह्यात अधिक बळकटी मिळेल, अशी अपेक्षा आहे. तसेच महाराष्ट्र झोन प्रभारी पंडितराव बोर्डे यांनी सांगितले की, राहुल करनाडे हे पक्षाच्या विचारधारेनुसार आणि बहुजन समाजाच्या कल्याणासाठी पूर्ण निष्ठेने काम करेन. राहुल करनाडे हे जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्ता आणि नागरिक यांच्यासोबत एकत्रितपणे पक्षाला नव्या उंचीवर नेण्यासाठी प्रयत्न करेल या आशेने त्यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी भरत खंदारे , विनोद बिरसोने, धनराज डोंगरे, प्रकाश बोडले, इस्माईल भाई शेख फिरोज, सिद्धार्थ मोरे , अमोल भक्कड, भैय्यासाहेब साळवे , किशोर बोरुडे , कुलदीप चांदोडे, राम जोहरे , विजय भगत , संजय खरात, कन्हैया गरडवाल, अशोक घोडे , दीपक भालेराव, इरफान बागवान व आजी माझी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होती. या नियुक्तीमुळे जालना जिल्ह्यात बहुजन समाज पार्टीच्या कार्याला गती मिळेल आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याला अधिक बळ मिळेल, अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

## आझाद मैदान ते मंत्रालय मोर्चा - धर्मा खिल्लारे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषद नगरपंचायत सफाई कामगार व कर्मचाऱ्यांची वेतनामुळे उपासमार होत आहे. तसेच शासनाच्या वित्त विभागाची आडमुठी भूमिका व नगर विकास विभागाच्या ढसाळ कारभारामुळे समन्वय समिती तर्फे ९ सप्टेंबर २०२५ रोजी आझाद मैदान ते मंत्रालय मुंबई या दरम्यान मोर्चाचे आयोजन केले असल्याची माहिती सुरेश पोसतांडेल प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र व धर्मा खिल्लारे मा. प्रशासकीय अधिकारी व नगरपरिषद, नगपंचायत कर्मचारी / संवर्ग संघटना ( शासन मान्यताप्राप्त) यांनी दिली आहे. राज्यातील नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांना शासनामार्फत वेतनासाठी दिल्या जाणाऱ्या सहाय्यक अनुदानाबाबत वित्त विभागाची फार मोठी भूमिका आहे मात्र नगरविकास विभाग आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांच्या ढिसाळ कारभारामुळे राज्यातील नगरपरिषद नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांचे मागील चार महिन्यापासून वेतनासाठी हाल होत आहेत. वेतनामुळे सफाई कामगार व कर्मचा-यांवर उपासमारीची वेळ आली असून बँकेचे व विमा कंपन्यांचे हप्ते थकीत होत असल्याने कर्मचाऱ्यांचा सिबील स्कोर खराव होत

आहे. अनेक वेळा निवेदन देऊनही शासन स्तरावर बैठकाही घेण्यात आल्या परंतु त्याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे समन्वय समितीला

आंदोलनाची भूमिका घ्यावी लागली. याकरता ९ सप्टेंबर रोजी भव्य मोर्चा बाबत प्रलंबित मागण्यासाठी शासनालाही निवेदन देण्यात आले आहे.

# महालक्ष्मी साजसजावट स्पर्धा उत्साहात

## दोन हजार स्पर्धकांनी नोंदवला सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** करण पाटील जाधव मित्र मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महालक्ष्मी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जवळपास दोन हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. संजयनगर, शंकरनगर, निळकंठनगर, छत्रपती कॉलनी, भवानी नगर, सिध्दिविनायक नगर, योगेश्वरी कॉलनी, तुलसी पार्क, सावरकर गल्ली, मिल्लत नगर, झेडपी क्वार्टर, रमाबाई नगर या भागात श्री महालक्ष्मी साजसजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या पाच वर्षापासून करण पाटील जाधव मित्र मंडळाच्यावतीने सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या पाचव्या वर्षी जवळपास दोन हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे. प्रथम बक्षीस स्मार्ट टीव्ही व सन्मान चिन्ह, द्वितीय बक्षीस गॅस शेगडी व सन्मान चिन्ह, तृतीय बक्षीस कुलर व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ पाच बक्षिसे व पाच कुपन मोहनराव इंगळे यांचे हॉटेल सनराईज सहभागी स्पर्धांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती आयोजक करण पाटील जाधव यांच्या वतीने देण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ड. अश्विनी धन्नावत, ड. पिंकी लड्डा, ड. आहुती विजय सेनानी यांनी काम पाहिले. यावेळी स्पर्धकांनी विविध देखावे, पर्यावरण झाडे लावा झाडे जगवा, मराठा आरक्षण देखावे सादरीकरण केले. यावेळी बंडू काळे, विठ्ठल देवकाते, राहुल गुंजकर, रोहित जाधव, स्वप्निल मोताळे, प्रतीक चिखले, गजानन लुटे व धीरज चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

### विप्र फाउंडेशनतर्फे गायत्री मंदिर परिसरात वृक्षारोपण

**जालना । प्रतिनिधी -** विप्र फाउंडेशन, जालना शाखेच्यावतीने शहरातील गायत्री मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली, सचिव पं. विजय व्यास, पवन जोशी, रामनिवास गौड, चंद्रप्रकाश श्रीमाली, सुर्यप्रकाश ओझा आदी मान्यवर उपस्थित होते.

# जी. जी. बगडिया प्री-प्रायमरी शाळेत गणेशोत्सव उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जी. जी. बगडिया प्री-प्रायमरी शाळेत नुकताच गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गणेशोत्सवानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणपती, शंकर, पार्वती अशा विविध देवी-देवतांची वेशभूषा केली होती. या वेशभूषेतील मुलांनी सादर केलेल्या नृत्यनाटिका आणि इतर कलाकृतींनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमामुळे मुलांना आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख झाली, तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळाला. कार्यक्रमाच्या वेळी शाळेच्या संचालिका सुचिता बगडिया, सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. या उत्सवामुळे शाळेत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



## आईच्या स्मरणार्थ वृक्षारोपण; पर्यावरणपूरक संस्काराची नवी दिशा



**भोकरदन । प्रतिनिधी -** तालुक्यातील कोळेगाव येथे घडलेली घटना एक भावनिक तसेच पर्यावरणपूरक संदेश देणारी ठरली. अंजनाबाई दगडू गावंडे यांच्या निधनानंतर त्यांच्या रक्षाविसर्जनाच्या दिवशी मुलगा ह.भ.प. साहेबराव महाराज गावंडे यांनी पारंपरिक पद्धतीला छेद देत, नदी-तलावात रक्षा विसर्जन न करता स्वतःच्या शेतात खड्डा करून त्यात रक्षा विसर्जित करून झाड लावले.

सामान्यतः हिंदू संस्कृतीनुसार रक्षाविसर्जनासाठी गंगे, गोदावरी, नर्मदा यांसारख्या पवित्र नद्यांमध्ये किंवा इतर तीर्थक्षेत्रांत रक्षा विसर्जित करण्याची प्रथा आहे. मात्र या प्रथेच्या वाढत्या प्रमाणामुळे नद्यांचे प्रदूषण वाढत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

गावातील गजानन पाटील गावंडे (उपसरपंच, कोळेगाव) यांनीही स्पष्ट केले की पारंपरिक पद्धतीत प्रदूषणाचा धोका आहे. त्याऐवजी शेतातच झाडाच्या खड्ड्यात रक्षा विसर्जन केल्यास पर्यावरणाचे रक्षण होईल तसेच वृक्ष संवर्धनालाही हातभार लागेल.

साहेबराव महाराज यांनी झाड लावतांना म्हटले आहे की, हे झाड पाहताना मला माझ्या आईची आठवण कायम राहील, हा भावनिक दृष्टिकोन केवळ वैयक्तिक नसून सम ाजालाही प्रेरणा देणारा आहे. मृत्यूला स्मृतीत रुपांतरित करून तो वृक्षसंवर्धनाशी जोडणे ही एक अभिनव सामाजिक जाणीव आहे. या उपक्रमामुळे वृक्ष लागवडीला चालना मिळेल. प्रत्येक मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ झाड लावले, तर पर्यावरणीय संतुलन राखण्यास मदत होईल. प्रदूषण कमी होण्यास हातभार लागून नद्यांवरील प्रदूषण कमी होईल.

कोळेगावातील या उपक्रमातून संस्कार, श्रद्धा आणि पर्यावरण यांचा संगम साधता येतो. असा एक महत्त्वाचा संदेश मिळतो हा प्रयोग पुढे समाजात एक मृत्यू - एक वृक्ष अशा अभियानाच्या स्वरूपात रूढ झाला, तर तो पर्यावरण आणि परंपरा दोन्ही जपणारा ठरेल.

# जालन्यात आली हास्याची जंगी बारात

## प्रभाकर मोरे व सहकाऱ्यांनी जालनेकरांना पोट भरून हसवले

**जालना । प्रतिनिधी -** हास्य जत्रा फेम कलाकार प्रभाकर मोरे यांच्या 'आबाकी आयेगी बारात' या विनोदी नाट्य प्रयोगाने जालनेकरांना पोट भरून हसवले.

रौप्य महोत्सवी वर्ष साजऱ्या करणाऱ्या जालना गणेश फेस्टिव्हलमध्ये गुरूवारी ( दि. ४) हास्य जत्रा फेम कलाकार प्रभाकर मोरे यांच्या' आबाकी आयेगी बारात' या दोन अंकी विनोदी नाटकाचे सादरीकरण झाले. स्वामी समर्थ निर्मित व शिल्पकार प्रकाशित या नाटकाचे लेखन प्रदीप प्रभुणे यांनी केले आहे. विजय जोशी हे या नाटकाचे निर्माते तर प्रभाकर मोरे हे दिग्दर्शक आहेत. 'आबा' हे पात्र रंगविणारे प्रभाकर मोरे यांनी जालनेकरांना पोट भरून हसवले. याशिवाय धनश्री दळवी, विशाख म्हामणकर,रोहिणी झेंडे या कलाकारांनी आपल्या अभिनयातून हास्याची जंगी बारात जालन्यात आणली.

प्रारंभी महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून या नाट्यप्रयोगाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जालना गणेश फेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, अध्यक्ष अशोकराव आगलावे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे, संयोजन समितीचे सदस्य दिनेश फलके, राजेंद्र राख आदींच्या हस्ते संतोष खांडेकर यांच्यासह नगर अभियंता सय्यद सऊद, प्रभाकर मोरे, विजय जोशी, धनश्री दळवी, रोहिणी झेंडे, प्रदीप प्रभुणे आदींचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान, जगदीश गौड यांच्या क्रांतीवीर प्रतिष्ठानच्या वतीने शिवकालीन युध्द कलेचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.



शिवकालीन युध्द कला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. जालना गणेश फेस्टिव्हलचे कोषाध्यक्ष रवींद्र हुसे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमास राजेंद्र गोरे, सुभाष कोळकर,शरद देशम ुख, अशोक उबाळे, चंद्रशेखर वाळिंबे, किरण गरड, ज्ञानेश्वर कदम, प्रा. राजेंद्र भोसले , सुरेश मुळे, अजिंक्य घोगरे, प्रसाद वाढेकर, संदीप गायकवाड,अविनाश भंडे, रोहित देशमुख, उदय देशम ुख,संजय देशमुख,सौ.सीम ाताई खोतकर,सौ .विमलताई आगलावे यांच्यासह महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.